नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 11/07/2020 (शनिवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील नागपुर ते चंद्रपुर रोड अग्रवाल कंपनी जवळ येथे दिनांक 09/07/2020 चे 21:30 वा. ते 22.30 वा. दरम्यान गुरदीप सिंग तोमर सिंग(मृतक), वय 50 वर्ष, रा. आग्रा (युपी) हे गाडी खाली उतरले असता चडडा ट्रान्सपोर्ट ची गाडी क 1993 चा चालक आरोपी नामे– दिनेश उर्फ गिरी याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गुरदीप सिंग यांना धडक दिली. या अपघातात गुरदीप सिंग यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंद्रमनी मथुरा पाठक, वय 52 वर्ष, रा. ब्रम्हदेव नगर बंजरग चौक, तेली बांधा जि. रायपुर छत्तीसगड, ह.मु. चडडा ट्रान्सपोर्ट पेठनी धुमुस रोड चंद्रपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि भारती 8329306178 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील मौजा सबकुंड येथे दिनांक 10/07/2020 चे 08:00 वा. पुर्वी आसीफ शफी दिवान(मृतक), वय 36 वर्ष, रा. खरबी नागपूर याने त्याच्या ताब्यातील एमएच– 31/डीएल– 9329 क्रमांकाची डिस्कवर मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे स्वतः चालवून झाडाला धडक दिली. या अपघातात आसीफ दिवान हा गंभीर जखमी होवून तो स्वतःचे जागीच मरण पावण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आरीफ शफी दिवान वय 34 वर्ष रा सायखोड कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री ठाकरे 8888157262 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर मौजा टाकळघाट येथे दिनांक 10/07/2020 चे 05:45 वा. ते 06:30 वा. दरम्यान फिर्यादी या नेहमी प्रमाणे आरती करणे करीता गेल्या होत्या. दरम्यान फिर्यादींचे पती नामे– पंकज हरजीत हेन्डवे, वय 45 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, टाकळघाट, हिंगणा, जि. नागपूर याने अज्ञात कारणाने घराच्या छताला ओढणीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुदर्शना पंकज हेन्डवे, वय 40 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, टाकळघाट, हिंगणा, जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद बन्सोड 9673608642 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर मौजा वार्ड क्र. 02, भोजपुर येथे दरम्यान कु. फारीया निजाम पठाण, वय 19 वर्ष, रा. वार्ड क्र. 19, भोजपुर ता. कुही हि 03 महीन्यापासुन पबजी हा गेम मोबाईमध्ये खेळत राहत होती. ती डिप्रेशन मध्ये राहत होती व अभ्यास सुद्धा करीत नव्हती. दि 01/07/2020 चे दुपारी 15.00 वा दरम्यान तीने घरीच उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. त्यामुळे तिची प्रकृती खराब झाल्याने तिला प्रथम ग्रामीण रूग्णालय कुही व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान दि 02/07/2020 चे 10.30 तीचा मृत्यु झाला. संबधीत कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा ओमकार 9552516703 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर